९२९/५

सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे-1 यांचे कार्यालय,
मध्यवर्ती इमारत ,१ बी.जे. रोड , पुणे -४११००१
ई मेल- drcs-fin.pune@gov.in , commcoop2011@gmail.com
दूरध्वनी क्र. ०२० २६१२२८४६/४७ विस्तारीत क्र. २१७ ते २१९

जा.क्र.कृषीपत-२/ संस्था सचिव /नियूक्ती /२०१६
दिनांक :- १२ मे, २०१६

**परिपत्रक**

**विषय :- प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाकडील सचिव नियुक्तीसाठीच्या निकषामध्ये सुधारणा करण्याबाबत**

संदर्भ :- १.या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.अर्थ/अज/वैद्यनाथन/गटसचिव/०९/ दिनांक ३०/०९/२००९
२. या कार्यालयाकडील कलम ७९(१) खालील दिनांक ०६/१२/२०१० रोजीचे निर्देश

उक्त संदर्भाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे

संदर्भिय परिपत्रकाद्वारे विकास संस्थांच्या पुर्नजिवन पॅकेजच्या अंमलबजावणी पश्चात राज्यातील गटसचिवांसाठीची संवर्गीकरण योजना संपुष्टात आल्यानंतर करावयाच्या उपाययोजना व गटसचिवाच्या सेवा विषयक बाबीवर करावयाच्या कार्यवाही बाबतच्या सुचना निर्गमित केल्या आहेत.

या परिपत्रकातील बाब क्र.०७ मध्ये ज्या संस्थांना देखरेख संस्थेकडील गटसचिव उपलब्ध होणार नाहीत, अशा संस्थांना सचिवाची नियुक्ती करण्यासाठीच्या अर्हता/ निकष नमुद करण्यात आलेले आहेत.

दिनांक १२/१०/२०१५ रोजीच्या राज्यस्तरीय समितीमध्ये उक्त निकषामध्ये सुधारणा करण्याबाबत चर्चा होऊन निर्णय घेण्यात आला व दिनांक ०५/०३/२०१६ रोजीच्या सभेमध्ये याबाबत पुन्हा चर्चा होऊन सुधारित निकष निश्चित करण्यात आले. त्यानूसार विकास सेवा संस्थांकडे सचिव पदावर नियुक्त करावयाच्या व्यक्तीकडे खाली नमूद केल्याप्रमाणे शैक्षणीक व इतर अर्हता असाव्यात.

| सांप्रत निकष | सुधारित निकष |
|---|---|
| १.तो महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असला पाहिजे.<br>२.त्याचे वय नेमणुकीच्या तारखेस २१ पेक्षा कमी असू नये. (राज्यस्तरीय समितीच्या दिनांक ०८/०७/२०११ च्या सभेतील विषय / ठराव क्र.०३ नुसार | क) १) संबंधित व्यक्ती कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा, तिने /त्याने हाय्यर डिप्लोमा इन को.ऑप.मॅनेजमेंट / जी.डी.सी.ॲण्ड ए / वाणिज्य शाखा पदवी प्राप्त केली असल्यास प्राधान्य राहील.<br>२) वयोमर्यादा किमान २३ व कमाल ३५ वर्षे असावी. |

| | |
|---|---|
| किमान वय २१ व कमाल ३३ असावे असा निर्णय झाला आहे)<br><br>३.तो नेमणुकीच्या तारखेस मान्यताप्राप्त मंडळाची / विद्यापिठाची पदवी परिक्षा द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असावा.<br><br>४.तो महाराष्ट्र स्टेट सर्टिफीकेट इन इनफॉर्मेशन टेक्नॉलॉजी (MSCIT) परिक्षा उत्तीर्ण असला पाहिजे.<br><br>५.तो महाराष्ट्र स्टेट को.ऑप.युनियन पुरस्कृत सहकारी पदविका (LDC किंवा DCM) धारण करणारा असावा.<br>६. तो CAS प्रमाण दप्तर लिहीणे बाबत प्रशिक्षण घेतलेला असावा. | ३) तिने /त्याने महाराष्ट्र स्टेट सर्टिफीकेट इन इनफॉर्मेशन टेक्नॉलॉजी (MSCIT) प्रमाणपत्र धारण केलेले असावे.<br>**किंवा**<br>ख) संबंधित व्यक्तीने विकास सेवा संस्थे मध्ये लिपीक पदावर कामकाज केले असल्यास-<br>१) शैक्षणिक पात्रता किमान १२ वी उत्तीर्ण व प्रत्यक्ष ५ वर्ष कामकाजाचा अनुभव असावा किंवा शैक्षणिक पात्रता किमान १० वी उत्तीर्ण व प्रत्यक्ष १० वर्षे कामकाजाचा अनुभव असावा.<br>२) वयोमर्यादा किमान २३ व कमाल ३५ वर्षे असावी.<br>३) तिने /त्याने महाराष्ट्र स्टेट सर्टिफीकेट इन इनफॉर्मेशन टेक्नॉलॉजी (MSCIT) प्रमाणपत्र धारण केलेले असावे. |

उक्त नमूद अर्हता धारण करणा-या व्यक्तीस विकास सेवा संस्थांकडे सचिव पदावर नियुक्ती देता येईल. या अर्हता निकषांमधून सवलत देता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

उक्त सुधारित निकषामधील अ.क्र.(क) १) मधील पदवीधर व्यक्तीस समान लेखा पध्दती (Common Accounting System) प्रमाणे संस्थेचे दप्तर लिहीण्याचा अनुभव नसल्यास त्यास संबंधीत संस्थेच्या खर्चाने जिल्हास्तरीय समिती मार्फत असे किमान तीन महिने कालावधीचे प्रशिक्षण देण्यात यावे.

सचिव नियुक्तीच्या अनुषंगाने संस्थास्तरावर, सहाय्यक/ उपनिबंधक स्तरावर खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१. विकास सेवा संस्थामधील सहायक सचिव तथा लिपीक पदावरील कामकाजाच्या अनुभवाची पडताळणी संस्थेने /सहायक-उपनिबंधक यांनी संबंधित संस्थेच्या दाखल्यावरून तसेच संस्थेच्या लेखापरीक्षण अहवालातील याबाबतच्या नोंदीवरून करावी.

२. संस्थेने संबंधित व्यक्तीची सचिव पदावरील नियुक्ती करारपध्दतीने करावी. अशा पदवीधर व्यक्तीस समान लेखा पध्दती (Common Accounting System) प्रमाणे संस्थेचे दप्तर लिहीण्याचा अनुभव नसल्यास त्यास संबंधीत संस्थेच्या खर्चाने जिल्हास्तरीय समिती मार्फत असे किमान तीन महिने कालावधीचे प्रशिक्षण द्यावे.

३. संस्थेने संबंधित व्यक्तीची सचिव पदावरील नियुक्ती वेतनश्रेणी ऐवजी शक्यतो एकत्रित मानधनावर करावी. असे मानधन निश्चित करताना संस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांचा पगार भत्त्यावरील वार्षिक खर्च संस्थेच्या खेळत्या भांडवलाच्या १.५ टक्के पेक्षा अधिक असणार नाही याची दक्षता घ्यावी. संस्थेवर कायमस्वरूपी आर्थिक जबाबदारी येणार नाही याचीही खबरदारी घेण्यात यावी.

४. संस्थेने उक्त नमुद करारामध्ये सचिव पदावरील नियुक्तीचा कालावधी, सेवा -शर्ती, मानधन, संस्थेकडील देय अन्य सेवा-सुविधा,रजा नियम, कार्य-कर्तव्ये, जबाबदाऱ्या-दायित्वे, कामकाजाच्या वेळा इत्यादीचा सुस्पष्ट उल्लेख असावा.

५. संस्थेने संबंधित व्यक्तीकडून किमान रू.२५००० रकमेचा जामिन रोखा (सेक्युरिटी बाँड) अगर फायडेलिटी (निष्ठा) बाँड घ्यावा.

६. संस्थेने करार संपण्यापुर्वी किमान ३ महिने आधी पुर्ननियुक्ती किंवा नवीन नियुक्तीची कार्यवाही सुरू करावी.

७. एकाच व्यक्तीची एकापेक्षा अधिक संस्थेवर, मानधन विभागणीच्या कारणास्तव तसेच कामकाजाची व्याप्ती विचारात घेऊन नियुक्ती करावयाची असल्यास अशा प्रत्येक संस्थेने वरीलप्रमाणे कार्यवाही करावी.

८. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७४ मधील तरतुदीनुसार संस्थेने सचिव नियुक्तीस मान्यता मिळणेसाठी संबंधित सहायक / उपनिबंधक यांच्याकडे अर्ज करावा. सहायक / उपनिबंधक यांनी अशी मान्यता देण्यापुर्वी सहकार आयुक्तालयाकडील जा.क्र. अर्थ/ अज/ वैद्यनाथन/ गटसचिव /२००९ दिनांक ३०/०९/२००९ रोजीच्या परिपत्रकात नमुद केल्याप्रमाणे जिल्हास्तरीय समितीची पुर्व मान्यता घ्यावी.

९. सहाय्यक /उपनिबंधक यांनी उक्त सर्व बाबींची पुर्तता झाल्यानंतर द्यावयाच्या मान्यता पत्रामध्ये संबंधित सचिवाची सहकार विभाग /शासनाप्रती असलेल्या दायित्वाचा उल्लेख करावा. त्यामध्ये विकास सेवा संस्थांच्या नियमित आढाव्यासाठी पाक्षिक सभांना उपस्थिती, पिक कर्ज वाटप, नवीन सभासद वाढ, कर्ज वसुली, वार्षिक/नियतकालीक माहित्या इत्यादी बाबींचा उल्लेख करावा.

१०. जिल्हास्तरीय समितीने उक्त प्रमाणे मान्यता देताना सहकार आयुक्त व निबंधक पुणे यांचे कडील दिनांक ०६ / १२ /२०१० रोजीच्या कलम ७९(१) मधील निर्देशामध्ये नमुद केल्यानुसार जिल्हयातील देखरेख संस्थांकडील सचिवांना, त्यांच्या वेतन भत्त्याचा विचार करून विकास सेवा संस्थांनी सामावून घेतले असल्याची खात्री करावी.

(चंद्रकांत दळवी)
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था ( सर्व )
३) जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था, (सर्व)
४) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (सर्व)